ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

वर्ष ३१ | पुणे, बुधवार ३ ऑगस्ट, १९६६ | अंक १५




नित्य नवे, फॅशनेबल आणि प्रशंसनीय

ठाकरसी फॅब्रिक्स्

फॅशनसाठी सर्वोत्तम निवड

सॅनफोराइज्ड लेबल असलेले कापड SANFORIZED



ठाकरसी ग्रूप

- धी हिंदुस्तान स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग मिल्स कं. लि.
- धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.

TH-56 MR

# विविध माहिती

**पूर्व पाकिस्तानसाठी चीनचा तांदूळ**—प्रेसिडेंट अयुबखान ह्यांनी विनंती केल्यावरून चीन पूर्व पाकिस्तानसाठी १ लाख टन तांदूळ पाठविणार आहे. पूर्व पाकिस्तानात अन्नधान्याची टंचाई तीव्र स्वरूपात जाणवत आहे. अतिवृष्टीमुळे पूर्व पाकिस्तानातील भाताचे पीक वाहून गेले आहे. परिणामी तांदुळाची भाववाढ शिगेला पोचली आहे.

**भोजनाबद्दल मेहनताना**—लंडनमधील विद्यापीठांत शिकणाऱ्या १४ विद्यार्थ्यांना भोजनाबद्दल दर आठवड्याला ७ पौंड मुशाहिरा देण्यात येतो. ह्या विद्यार्थ्यांचे दोन गट पाडण्यात आले असून एका गटाला भरपूर आहार आणि दुसऱ्याला बेताचा आहार देण्यात येतो. खाण्याच्या सवयींचा लठ्ठपणावर काय परिणाम होतो ते पाहण्यासाठी हा प्रयोग करण्यात येत असून आहारशास्त्रज्ञांच्या देखरेखीखाली तो चालू आहे.

**राजस्थानात जमीनधारणा कायदा**—राजस्थान सरकारने कमाल जमीनधारणाबाबत केलेला कायदा १९६३ सालीच अमलात यावयाचा होता; परंतु त्या वेळी घटनात्मक मुद्द्यावर त्याला हरकत घेण्यात आली होती. १९६५ साली भारत–पाक संघर्षामुळे त्याची अंमलबजावणी तहकूब करण्यात आली होती. आता कायदा अमलात येणार आहे. ५ माणसांच्या कुटुंबाला ३० एकर जमीन, ही मर्यादा ठरविण्यात आली आहे.

**गुजरातमधील गौळवाड्यांचा विस्तार**—गुजरातमधील गौळवाड्यांचा व दूध-पुरवठा केंद्रांचा विस्तार करण्याचे राज्यसरकारने ठरविले आहे. ह्या कामासाठी १०४ लाख रुपयांवर रकमेची तरतूद करण्यात आली आहे. सुरेंद्रनगर, जामनगर, गोंडल व राजकोट येथील दूधकेंद्रांतर्फे पुरविल्या जाणाऱ्या दुधात वाढ करण्यात येणार आहे.

**बाह्य मंगोलियाला मदत**—रशियाच्या कक्षेत असणाऱ्या बाह्य मंगोलियन प्रजासत्ताक राज्याला २५ हजार डॉलर्सची तातडीची मदत देण्याची तयारी अमेरिकेने दाखविली आहे. ह्या देशात अलीकडे पुरामुळे खूप नुकसान झाले होते. मंगोलियाशी अमेरिकेचे राजनैतिक संबंध नसल्यामुळे मदत संयुक्त राष्ट्र संघटनेच्या मार्फत देण्यात येईल. मदत केवळ मानव्याच्या भूमिकेवरून देण्यात येणार आहे.

**हलक्या प्रतीच्या कोळशाचा उपयोग**—कच्छमधील खनिज संपत्तीची पाहणी करण्यासाठी जर्मन तज्ज्ञांच्या एका मंडळाला गुजरात सरकारने पाचारण केले होते. कच्छमध्ये सापडू शकणाऱ्या हलक्या प्रतीच्या कोळशाचा उपयोग करून वीजनिर्मिती करता येणे शक्य आहे, असा अभिप्राय मंडळाने व्यक्त केला आहे. पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या प्रारंभी कच्छमधील एखाद्या योग्य ठिकाणी उष्णताजन्य वीजकेंद्र उभारण्यात येण्याचा संभव आहे.

**मक्याला गिऱ्हाईक नाही**—उत्तर प्रदेश सरकारच्या धान्यकोठारात कित्येक लाख मण मक्याचा साठा पडून आहे. त्याची विक्री करण्यास सरकार तयार आहे. परंतु सरकार मागत असलेली किंमत देऊन तो घेण्यासाठी व्यापारी येत नाहीत. परिणामी, सर्व मका खाण्यास अयोग्य होत आहे. गेल्या खरीप हंगामात राज्य सरकारने ३६ रुपये क्विंटल ह्या भावाने मक्याची खरेदी केलेली आहे.

**इंडिअन एअर लाईन्स**—भारतामधील अंतर्गत विमान वाहतूक करणारी इंडियन एअर लाईन्स ही संघटना आपली सर्व वाहतूक लवकरच जेटवर चालणाऱ्या विमानांच्या साह्याने करणार आहे. त्यासाठी लागणाऱ्या विमानांची पाहणी करण्यासाठी ४ तंत्रज्ञांचे एक मंडळ परदेशात जाणार आहे. हॉलंड, फ्रान्स, ब्रिटन व अमेरिका ह्या देशांचा दौरा मंडळ करील.

**लैंगिक जीवनाचा अभ्यास**—स्वीडनच्या नागरिकांच्या लैंगिक जीवनाची अधिकृत पाहणी करण्याचे त्या देशाच्या सरकारने ठरविले आहे. पाहणीत १८ ते ६० वर्षे वयाच्या २,२०० स्त्री-पुरुषांना २०० नाजूक स्वरूपाचे प्रश्न विचारण्यात येणार आहेत. त्यांनी दिलेल्या उत्तरांवरून पाहणीमंडळ निष्कर्ष काढण्याचे काम करील.

**कच्छमधील कोळशाचा उपयोग**—कच्छमध्ये सापडणाऱ्या लिग्नाइट ह्या हलक्या प्रतीच्या कोळशाचा व्यापारी दृष्टीने उपयोग करता येईल की नाही हे पाहण्यासाठी पूर्व जर्मनीमधील चार तज्ज्ञ गुजरातचा दौरा करीत आहेत. ते गुजरातच्या सरकारने मुद्दाम बोलावून घेतले होते. ह्या कोळशापासून रासायनिक खते बनविता येण्यासारखी आहेत असे म्हणतात.


" पोटाला चिमटा बसेपर्यंत बचत करा "

—श्री. अशोक मेहता,
नियोजनमंत्री

वरील आदेश आपली वैयक्तिक योजना व बचत कशी असावी याची मर्यादा दर्शविणाराच आहे.
वैयक्तिक बचत ही राष्ट्रीय बचत आहे. तुमच्या या बँकेच्या आकर्षक बचत योजना राबवा.

दि बेळगांव बँक लिमिटेड

शेड्यूल्ड बँक ] [ स्थापना : १९३०

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव.

महाराष्ट्र, म्हैसूर राज्य व गोवा प्रदेशात
एकूण ३८ शाखांचे जाळे.

# अर्थ

बुधवार, ३ ऑगस्ट, १९६६





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद् वामन काळे


### जननाचे प्रमाण घटल्याने पूर्व युरोपात चिंता

जगात, विशेषतः आशिया खंडात, वाढत्या लोकसंख्येच्या प्रश्नाने गंभीर स्वरूप धारण केले आहे. पूर्व युरोपातील देशांत मात्र दर हजारी जननाचे प्रमाण घटत चालल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात येत आहे. तेथे मुलांची टंचाई भासत आहे. परिणामी, त्या देशांतील तरुणांची संख्या कमी होत असून वयस्कर आणि वृद्ध माणसांची संख्या वृद्धिंगत होत चालली आहे. जननाचे प्रमाण घटण्यास तीन प्रमुख कारणे सांगण्यात येत आहेत : (१) पूर्व युरोपातील देशांत स्त्रियांचे प्रमाण पुरुषांपेक्षा अधिक आहे, (२) काही देश भ्रूणहत्येवर काही प्रकारचे निर्बंध घालतात हे खरे असले तरी भ्रूणहत्या ही कायदेशीर मानण्यात येते आणि (३) संततिप्रतिबंधक उपायांचा प्रसार फार झपाट्याने होत चालला आहे. हंगेरी, पूर्व जर्मनी आणि झेकोस्लोव्हाकिया ह्या देशांतून मुलांची संख्या जोराने रोडावत चाललेली आहे. हंगेरीत ह्या विषयाविषयी सडेतोड चर्चा चालू आहे. हंगेरीत दर हजारी वार्षिक जननाचे प्रमाण १३·१ इतके म्हणजे जगातील सर्वांत कमी आहे. लोकसंख्येच्या प्रश्नासंबंधीचे एक हंगेरीअन तज्ज्ञ म्हणतात, की तरुण वयाच्या लोकांची संख्या झपाट्याने खालावत चालली असून ज्यांच्या योगक्षेमाची जबाबदारी दुसऱ्यांवर पडते अशा वृद्धांची संख्या सतत वाढत चालली आहे. येत्या काही वर्षांतच ह्या परिस्थितीचे भयानक परिणाम दिसून येऊ लागतील. पूर्व युरोपातील अनेक तरुण जोडपी सुखासीन आयुष्य पसंत करतात. मुले व त्यांची जबाबदारी अंगावर घेण्याची त्यांची तयारी नसते. हंगेरीत तर एकापेक्षा अधिक मुले असणाऱ्या मातांची कुचेष्टा करण्याची प्रवृत्ती दिसून येते. फार प्रजा असणाऱ्या स्त्रिया कारखान्यांच्या चालकांना नको असतात.

---

### राजभवनावरील खर्चात काटकसर करा

चांगल्या व लोकाभिमुख राज्यकारभाराच्या लक्षणांत काटकसरीच्या कारभाराला महत्त्वाचे स्थान आहे. कुटुंबाच्या अगर राष्ट्राच्या आय-व्ययात योग्य ठिकाणी योग्य खर्च करण्यात यावा हे केव्हाही उचितच होय. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर घटक राज्यांच्या गव्हर्नरांच्या जागा निर्माण करण्यात आल्या. राज्यांच्या गव्हर्नरांच्या इतमामावर बराच खर्च करण्यात येतो. लोकसभेतील काँग्रेस पक्षाचे एक सभासद श्री. माथूर ह्यांनी काटकसरीसंबंधी मुख्यप्रधानांना काही सूचना केल्या आहेत. ह्या सूचनापत्राची १५ पाने आहेत. राज्यांच्या गव्हर्नरांवर करण्यात येणाऱ्या खर्चाला जास्तीत जास्त ५ लाख रुपयांची मर्यादा घालण्यात यावी अशी सूचना श्री. माथूर यांनी केली आहे. राज्यकारभार करण्याची सध्याची जी पद्धत व नियम आहेत त्यांच्या चौकटीतही काटकसरीला बराच वाव असल्याचे त्यांचे मत आहे. निरनिराळ्या राज्यांतील गव्हर्नरांवर होणाऱ्या खर्चाची रक्कम वेगवेगळी आहे. केरळमध्ये ही रक्कम ३·५ लाख रुपये आहे, तर महाराष्ट्रात ती १२·३५ लाख रुपये आहे. भारतात चालू असलेल्या लोकशाहीच्या जमान्यात इतक्या मोठ्या रकमांचे खर्च कितपत न्याय्य आहेत, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. त्यांच्या मताने, राज्यांच्या गव्हर्नरांना प्रासादतुल्य निवासस्थाने पुरविण्याची काही आवश्यकता नाही. त्याचप्रमाणे ह्या निवासस्थानांभोवती असणाऱ्या मोठ्या आवारांचीही गरज नाही. ह्या दोन बाबींपुरतीच काटकसर करण्यात आली तरी सालीना २० लाखांची बचत होण्यासारखी आहे. परदेशी बनावटीच्या आरामशीर व विलासी मोटारगाड्या अगदी कमीत कमी ठेवण्यात याव्या आणि बाकीच्या विकून टाकाव्यात. असे करण्यात आले, तर मध्यवर्ती सरकारला किमान १० लाख रुपयांचे उत्पन्न होईल आणि दरसाल १ लाख रुपयांची बचत होईल.

---

### रंगीत चित्रपटांचे उत्पादन बंद पडले

फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया ह्या संघटनेचे उपाध्यक्ष श्री. श्रीनिवासन् ह्यांनी रुपयाच्या अवमूल्यनामुळे चित्रपटाच्या धंद्यावर झालेल्या वाईट परिणामांची माहिती जाहीर केली आहे. ते म्हणाले की गेल्या पाच आठवड्यांत चित्रपटाच्या धंद्याला जवळजवळ ३० लाख रुपयांचा फटका खावा लागला आहे. चित्रपटांची निर्यात करण्यास उत्तेजन देणारे मंडळ बरखास्त करण्यात आले असून रंगीत चित्रपटांसाठी लागणारी फिल्म आयात करण्याचे पूर्णपणे बंद करण्यात आले आहे. रुपयाच्या अवमूल्यनाचे धंद्यावर होणारे परिणाम आता स्पष्ट होत चालले आहेत. सर्वच धंद्यांपुढे गंभीर संकटाची छाया पसरलेली दिसत आहे. अवमूल्यनाचा निर्णय घेण्यात आला, त्यावेळी भारतात ६० रंगीत चित्रपटांचे प्राथमिक काम चालू होते. परंतु रंगीत कच्ची फिल्म मिळणे अशक्य झाल्यामुळे निर्माते स्वस्थ बसून आहेत. चित्रपट काढण्यासाठी त्यांनी काढलेल्या कर्जावरील व्याजाची रक्कम मात्र फुगत चाललेली आहे. त्याच वेळी स्टुडिओतील वेळ आणि कामगारांचा वेळ वाया चाललेला आहे. रंगीत चित्रपट काढण्यासाठी लागणारी फिल्म आयात करण्यासंबंधीचे सरकारचे धोरण अद्याप निश्चित करण्यात आलेले नाही. त्यामुळे धंद्यात गुंतलेल्या सर्व लोकांचे भवितव्य धोक्यात आलेले आहे. काळ्या-पांढऱ्या बोलपटांसाठी लागणारी कच्ची फिल्महो पुरेशा प्रमाणात उपलब्ध होऊ शकत नाही. ह्या फिल्मचा साठा मर्यादित आहे, आणि फिल्मची मागणी करणारे धंदेवाले मात्र पूर्वीच्या मानाने अधिक झालेले आहेत. चित्रपटाच्या धंद्यात ज्यांनी पूर्वीच बस्तान बसविले आहे, त्यांना लागणारी कच्ची फिल्म संपूर्णतया पुरविण्यात आली, तर नव्याने पदार्पण करणाऱ्या धंदेवाल्यांना पुरवठा होण्याची आशाच नाही.

---

# एम्. आय्. टी. चा पुण्यातील विद्यार्थी शंतनुराव किर्लोस्कर

[ "फॉरच्युन" ह्या अमेरिकेतील उद्योगपतींच्या सर्वश्रेष्ठ, जगप्रसिद्ध मासिकात श्री. शंतनुराव किर्लोस्करांच्या वैशिष्टयपूर्ण थोरवीचे वर्णन करणारा लेख नुकताच प्रसिद्ध झाला आहे. शंतनुराव हे एम्. आय्. टी. चे माजी विद्यार्थी आहेत, ह्या गोष्टीला 'फॉरच्युन'ने विशेष महत्त्व दिले आहे, हे लेखावरील मथळाच स्पष्ट करतो. प्रस्तुत अत्यंत उद्बोधक लेखाचा अनुवाद मराठी वाचकांसाठी आम्ही सादर करीत आहो. ]

आपल्या उजव्या मांडीवर थाप मारून, 'निघू या आता" असे म्हणणे, ही शंतनु लक्ष्मण किर्लोस्करांची एक प्रिय लकब आहे. ज्या ईर्षेने किर्लोस्करांना भारताचे धडाडीचे अग्रेसर उद्योगपती केले आहे, त्या ईर्षेचीच ती लकब द्योतक आहे. ३·२ कोटी डॉलर्सच्या जिंदगीच्या आणि ६·४ कोटी डॉलर्सची विक्री असलेल्या नऊ स्वतंत्र इंजिनिअरिंग कंपन्या, आता ६२ वर्षांच्या ह्या शंतनुरावांनी एकसूत्रात आणल्या आहेत. प्रायव्हेट सेक्टरमध्ये इंजिनिअरिंग उद्योगांचे एवढे प्रचंड दुसरे एकत्रीकरण नाही. सात हिंदी शहरांत किर्लोस्कर समूहाचे कारखाने असून त्यांतील कामगार संख्या १३,००० आहे. शेती आणि कारखाने ह्यांच्या उपयोगाचे ह्या फॅक्टऱ्यांतून विविध प्रकारच्या भांडवली स्वरूपाच्या मालाचे उत्पादन होते. किर्लोस्कर एंजिनांवर चालणारे किर्लोस्कर पंप भारतांतील शेतीला पाणी पुरवीत आहेत. किर्लोस्कर लेथ्सवर नवीन मशीन टूल्स तयार होत आहेत. "आम्ही जे जे तयार करतो, ते ते भारताच्या विकासाला आधारभूत, अत्यंत आवश्यकच आहे" असे शंतनुराव म्हणतात.

शंतनुरावांचे वडील शिक्षक होते. त्यांना डावलून दुसऱ्याला बढती दिली, म्हणून ते धंद्यात शिरले. लोखंडी नांगर आणि शेतीची इतर अवजारे बनवून, आपल्या मुलाला विद्येसाठी परदेशी पाठविता येण्याइतपत पैसा त्यांनी मिळविला. परंपरेप्रमाणे त्यांनी मुलाला ऑक्सफर्ड किंवा केंब्रिज विद्यापीठात शिकायला न धाडता मॅसॅच्युसेट्स इन्स्टिटयूट ऑफ टॅक्नॉलॉजीत त्याला घातले. ब्रिटनपेक्षा अमेरिका टेक्नॉलॉजीमध्ये पुढे गेलेला देश आहे, असे त्यांचे मत होते.

१९२६ मध्ये पदवी मिळवून शंतनुराव घरच्या धंद्यात सामील झाले, आणि लागलीच त्यांनी शेंगा फोडण्याच्या यंत्रात आणि उसाच्या चरकात सुधारणा घडवून आणली. नंतर त्यांनी सेंट्रिफ्युगल पंप, डिझेल इंजिने आणि मशीन टूल्स ह्यांच्या निर्मितीसाठी शाखांचा विस्तार केला. भारतातील खेडेगावातून वीजपुरवठा सुरू होणार, त्याचा फायदा घेण्यासाठी त्यांनी १९४६ मध्ये विजेच्या मोटारींच्या फॅक्टरीची भर घातली.

उत्पादनाची कक्षा वाढविण्यासाठी शंतनुरावांनी पुष्कळ वेळा विदेशी कंपन्यांशी लायसेन्सिंगच्या व्यवस्था घडवून आणल्या. त्यांच्या अगदी अलीकडच्या, म्हणजे १९६२ साली सुरू केलेल्या, उपक्रमातील परदेशीय सहकार्य अधिक निकटच्या स्वरूपाचे आहे. कोलंबस, इंडियनाच्या कमिन्स इंजिन कं. च्या सहकार्याने स्थापन केलेला तो कारखाना आहे. सात वर्षांपूर्वी कमिन्सची भारतात कारखाना काढण्याची इच्छा होती, पण त्यांनी हिंदी भागीदार घेतला पाहिजे असे सरकारने सांगितले. एका किर्लोस्कर कंपनीने २५·५% भाग घेतले, कमिन्सचे ५०% भाग आहेत आणि २४·५% भाग हिंदी लोकांनी घेतलेले आहेत. ह्या कारखान्यात सध्या एकूण उत्पादन-शक्तीचा पाव हिस्सा उत्पादन होत आहे. पण तो पूर्णपणे उत्पादन करू लागला म्हणजे किर्लोस्कर समूहातील तो सर्वांत मोठा, २·५ कोटी डॉलर्सच्या किमतीचे उत्पादन करणारा होईल.

किर्लोस्करांच्यापुढील मुख्य समस्या उत्पादन केलेल्या मालाच्या विक्रीची नसून पुरेसा माल उत्पादन करण्याची आहे. परदेशी हुंडणावळीच्या तीव्र तुटवड्यामुळे हिंदी कारखानदारांना स्वतः लागणारा कच्चा माल आणि सुटे भाग ह्यांची आयात करणे फार कठीण जाते. कलकत्ता आणि मुंबई येथील कित्येक कारखाने उत्पादनक्षमतेच्या निम्मेसुद्धा उत्पादन करू शकत नाहीत. पण किर्लोस्करांचे बहुतेक कारखाने रात्रंदिवस चालू आहेत. गेली पंधरा वर्षे किर्लोस्करांनी स्थानिक पुरवठा पद्धतशीरपणे वाढविला आहे; मग त्यासाठी १० ते १५% जास्त किंमत पडली तरी हरकत नाही; हे त्याचे रहस्य आहे. किर्लोस्कर स्वतः काही सुटे भाग तयार करतात; इतर हिंदी कारखानदारांनाही त्यांनी किर्लोस्करांच्यासाठी सुटे भाग बनविण्यास उद्युक्त केले आहे. निर्यातीवरही त्यांचा भर आहे; निर्यात केलेल्या मालाच्या पोटी त्यांना मिळणाऱ्या परदेशी चलनापैकी ४०% चलन स्वतःच्या कारखान्यांना आवश्यक त्या आयातीसाठी त्यांना आपोआपच मिळते. किर्लोस्कर समूहाच्या एकूण विक्रीपैकी ८% विक्री परदेशांत होते; शेजारच्या देशांतच मुख्यतः ही निर्यात होते.

शंतनुराव स्पष्टवक्ते आहेत; त्यांचे हास्य इतरांनाही आनंदित करणारे आहे. आपल्या वाढत्या साम्राज्यावर ते हलक्या हाताने नियंत्रण ठेवतात. आतापर्यंतच्या त्यांच्या उपक्रमांतील सर्वांत मोठी कंपनी, पुण्याची किर्लोस्कर ऑईल एंजिन्स, ह्या एकट्यावरच त्यांचा प्रत्यक्ष अमल आहे. त्यांचे दुय्यम अधिकारी बाकीच्या आठ फर्म्स चालवितात. त्यांना ते अधूनमधून विमानातून जाऊन भेट देतात. त्यांचे विमान पाइपर ॲपची जातीचे आहे. ते स्वतः चालवायला त्यांना आवडते. पण विमान सुरू करून वर जायला निघण्यातला आणि जमिनीवर उतरण्यातला धोका ते पत्करत नाहीत.

भारताच्या समाजवादी समाजरचनेच्या प्रयोगाचे ते प्रखर टीकाकार आहेत. हा प्रयोग निश्चित अयशस्वी होणार, असे त्यांचे स्पष्ट मत आहे. गेल्या वर्षी फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीचे अध्यक्ष ह्या नात्याने त्यांनी सरकारला खाजगी उद्योगधंद्यांवरील काही सरकारी नियंत्रणे उठविण्याचे आग्रहाने सांगितले; त्याचा थोडाबहुत परिणाम घडूनही आला. पण ही नियंत्रणे असताही आणि करांचे प्रमाण वाढते असताही ( ह्या करांमुळे उद्योगधंद्यांत पुनः गुंतवायला फार थोडा पैसा उरतो, अशी त्यांची तक्रार आहे. ) किर्लोस्करांनी उत्कृष्ट प्रगती केली आहे. त्यांच्या कंपन्यांची दरसाल सुमारे २० टक्के ह्या गतीने वाढ होत आहे आणि त्यांच्या गुंतविलेल्या भांडवलावर ५० टक्केपर्यंत निव्वळ नफा उरत आहे. नियोजनकारांमुळे नव्हे, तर त्यांच्यावर मात करून आम्ही आर्थिक यश मिळविले आहे असे शंतनुराव म्हणतात.

## रशियाच्या मदतीने सरकारी शेतवाड्या

रशियाच्या सहकार्याने भारतात सरकारी मालकीच्या १५ शेतवाड्या स्थापन करण्यात येणार आहेत. त्यांना लागणारी सर्व प्रकारची यांत्रिक अवजारे व साधने रशिया पुरविणार आहे. संकल्पित शेतवाड्यांपैकी ५ शेतवाड्या चालू सालीच स्थापन करण्यात येणार आहेत. भारतामधील अन्नधान्याचे दर एकरी उत्पादन सुधारलेली शेती करणाऱ्या देशांतील दर एकरी उत्पादनापेक्षा बरेच कमी आहे. उत्पादनात वाढ करण्यांच्या अनेक उपायांत सुधारलेल्या व जास्त पीक देणाऱ्या बियाणाला महत्त्वाचे स्थान आहे. म्हणून संकल्पित शेतवाड्यात बियाणाच्या पैदाशीला प्राधान्य देण्यात येणार आहे. प्रत्येक राज्यात एक सरकारी शेतवाडी स्थापन करण्याचा सरकारचा उद्देश आहे. पंजाब व मध्यप्रदेशाच्या सरकारांनी दोन शेतवाड्या स्थापन करण्यासाठी लागेल इतकी जमीन उपलब्ध करून देण्याची तयारी दाखविली आहे. प्रत्येक शेतवाडीचा विस्तार ५ ते १५ हजार एकरांच्या दरम्यान असेल. शेतवाड्यांवर जमीन सपाट करण्याची यंत्रे, यंत्रचलित नांगर, पेरणीयंत्रे, कापणी व मळणी करणारी यंत्रे, ह्यांचा वापर करण्यात येणार आहे. प्रत्येक शेतवाडीला इतकी यंत्रसामग्री पुरविण्यासाठी ३१ लाख रुपये खर्च येणार आहे. त्याशिवाय प्रत्येक राज्यात ह्या यांत्रिक साधनांची दुरुस्ती करण्यासाठी आणि ती कार्यक्षम स्थितीत राखण्यासाठी एकेक केंद्र स्थापन करण्यात यावयाचे आहे. प्रत्येक केंद्रासाठी १५ लाख रुपये खर्च येईल. शेतवाड्यांवर वापरात यावयाच्या अनेक प्रकारच्या अवजारांची सुस्थिती राखण्यासाठी अशा केंद्रांची फार आवश्यकता आहे. कारण त्यांच्या अभावी ही अवजारे निकामी बनण्याचा धोका आहे. सुमारे २० हजार ट्रॅक्टर्स दुरुस्ती अभावी पडून राहिल्याचा अनुभव आहे. आयातीवरील निर्बंध सैल करण्यात आल्यामुळे आता सुट्या भागांची अडचण भासणार नाही.

---

## अमेरिकेला विड्या निर्यात करण्याचे प्रयत्न

हिंदमध्ये तयार होणाऱ्या विड्या अमेरिकेला आणि युरोपला निर्यात करण्याची शक्यता अजमावण्यासाठी भारत सरकार आणि तंबाखूचे व्यापारी प्रयत्न करीत आहेत. तंबाखू निर्यात मंडळाने ह्यासाठी एक खास केंद्र स्थापन केले आहे. विडी धंद्याच्या मध्यवर्ती संघटनेतर्फे विड्यांचे काही नमुने अमेरिकेत प्रयोगशाळेत तपासून पाहण्यासाठी धाडण्यात येणार आहेत. भारतात दररोज किमान ७५ कोटी विड्या वळल्या जात असाव्यात असा अंदाज आहे. हा धंदा ग्रामोद्योगासारखा असून त्यावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर मिळून २० टक्के कर घेण्यात येतो. धंद्यात काम करणाऱ्या कामगारांची संख्या सुमारे २० लाख आहे. आतापर्यंत विड्यांची निर्यात करण्यासाठी विशेष जारीने प्रयत्न करण्यात आलेले नाहीत. तरीसुद्धा नवलाई म्हणून विड्यांना परदेशांतील बाजारपेठ मिळण्याची शक्यता आहे.

---

## माशांनी समृद्ध असलेला हिंदी महासागर

रशियन सरकारच्या मच्छीमार खात्याने भारताच्या परिसरात असलेल्या समुद्राच्या काही भागांची पाहणी करण्याकरता तज्ज्ञांचे एक मंडळ पाठविले आहे. ह्या मंडळाने हिंदी महासागराची शास्त्रीय पाहणी केली आहे. हिंदी महासागराच्या ईशान्य भागाची पाहणी विशेष फलदायी ठरली. हा भाग म्हणजे कच्छपासून मुंबईपर्यंत पसरलेला सागर. ह्या भागात मच्छीमारीचा धंदा वाढविण्यास भरपूर वाव आहे असे मंडळाला आढळून आले. पाहणीचे काम ५ महिने चालले होते. अनेक प्रकारच्या माशांच्या जाती ह्या सागरभागात वास्तव्य करून आहेत. त्यांपैकी ५० जाती व्यापारी दृष्टीने उपयुक्त ठरण्यासारख्या आहेत. मंडळाने बंगालच्या उपसागराची आणि अंदमानच्या समुद्राचीही पाहणी केली; परंतु जलचर प्राणिजीवनाच्या दृष्टीने ती फारशी उपयुक्त ठरली नाही.

---

## आर्थिक साह्याच्या अटी कठीण होऊ लागल्या

अविकसित देशांना प्रगत देशांकडून मिळणाऱ्या आर्थिक साह्यासंबंधीच्या अटी अधिकाधिक कठीण होऊ लागल्या आहेत, असा अभिप्राय पॅरिसमधील एका आंतरराष्ट्रीय पाहणी संघटनेने व्यक्त केला आहे. गेल्या वर्षी गरीब देशांना देण्यात येणाऱ्या व्याजावरील कर्जाचा सरासरी दर ३ टक्क्यांवरून ३.६ टक्क्यांपर्यंत वाढला. विकसनशील देशांनी परदेशांकडून घेतलेल्या कर्जाचा १९६४ सालअखेरचा आकडा २,३६० कोटी डॉलर्सपर्यंत फुगला. १९६० ते १९६४ ह्या पाच वर्षांच्या कालात विकसनशील देशांना खाजगी व सरकारी पातळीवर देण्यात आलेल्या मदतीचा आकडा ४,५०० कोटी डॉलर्स इतका प्रचंड आहे. ह्या देशांना चालू वर्षी सुमारे ३ कोटी टन धान्य आयात करावे लागले असा अंदाज आहे.

---

## मोराची पिसे निर्यात केल्याने होणारी प्राप्ती

भारतामधून मोरपिसांची निर्यात करून दरसाल १ लाख ४० हजार रुपयांचे परदेशीय चलन मिळविण्यात येते. अमेरिका, जपान, फ्रान्स व हॉलंड ह्या देशांना पिसे मुख्यतः निर्यात करण्यात येतात. त्यांचा उपयोग शोभेच्या पोषाखासाठी व इतर कलापूर्ण वस्तूंसाठी करण्यात येतो. पिसांची अधिक निर्यात करता येईल; पण त्यामुळे मोरांची मोठ्या प्रमाणावर हत्या करण्यात येऊन हा डौलदार पक्षी नामशेष होईल अशी भीती आहे. मोर हा भारताचा राष्ट्रीय पक्षी असून तो गणपतीचे वाहन म्हणून पुराणात प्रसिद्ध आहे. मोर भारतात बहुतेक ठिकाणी आढळत असले तरी गुजरात, राजस्थान आणि उत्तर प्रदेश ह्या राज्यातून त्यांची संख्या मोठी आहे. गुजरात व राजस्थानात मोरांची हत्या करण्यास फार विरोध आहे. परंतु, मोरपिसे मधूनमधून झडतात त्यामुळे पिसांसाठी त्यांची हत्या करण्याची गरज नाही.

---

## शस्त्रे चालविणारा हात अजूनही महत्त्वाचा

व्हिएटनाममध्ये चालू असलेल्या युद्धात व्हिएटकाँग संघटनेचे गनिमी सैनिक अमेरिकेच्या मानाने जुनीपुराणी शस्त्रास्त्रे वापरीत आहेत. तरीसुद्धा अमेरिकन विमानांचा नाश करण्यात विमानविरोधी तोफांनीच अधिक चांगली कामगिरी केल्याचे आढळून आले आहे. याचे कारण त्या चालविणाऱ्या गोलंदाजांचे कौशल्य. वास्तविक व्हिएटकाँग सैनिक हवेतून हवेत स्फोट पावणारी व जमिनीवरून हवेत स्फोट पावणारी क्षेपणास्त्रेही वापरत आहेत; पण त्यांचा व्हावा तसा उपयोग होत नाही. गेल्या वर्षी भारत व पाकिस्तान ह्यांच्यात झालेल्या सशस्त्र संघर्षातही रणगाडे व विमानविरोधी तोफा चालविणाऱ्या तरबेज हिंदी सैनिकांनीच पाकिस्तानच्या अद्ययावत शस्त्रास्त्रांचा धुव्वा उडवला.

---

## ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. चे



## चेअरमन, श्री. हरिश्चंद्र पाटील

श्री. हरिश्चंद्र गोपाळ पाटील हे भारतातील सुप्रसिद्ध शेतीतज्ज्ञ आहेत. १९५२ मध्ये भातशेतीच्या विशेष अभ्यासासाठी ते जपानला गेले होते. तेथून आल्यानंतर त्यांनी जपानी पद्धतीच्या भातशेतीचा प्रसार देशामध्ये सर्वत्र केला. त्यानंतर चीन व रशिया या देशांनाही भेटी देण्याचा योग त्यांना आला आणि त्यामुळे वेगवेगळया देशांतील शेतीच्या पद्धती आणि नवीन नवीन सुधारणांचा करण्यात येत असलेला अवलंब यांचा अभ्यास त्यांना करता आला आणि आपल्या अनुभवाचा उपयोग त्यांनी भारतातील शेतीविषयक संशोधन करण्यामध्ये केला. ते स्वतः शेतकी विषयाचे पदवीधर असून कोसबाड (ता. डहाणू) येथील शेतकी शाळेचे प्रमुख आहेत. त्यांची संस्था पुणे विद्यापीठाने पदव्युत्तर शिक्षणासाठी मान्यता दिलेली संस्था आहे. श्री. अण्णासाहेब पाटील यांनी शेतीविषयक संशोधनात पुष्कळच प्रगती घडवून आणली आहे. विशेषतः कोकणात संकरित मका, लक्ष्मी कापूस व चिकू यांच्या लागवडीसाठी त्यांनी केलेले प्रयत्न आज सफल झालेले आहेत. शेतीबरोबरच आदिवासी जनतेच्या उन्नतीसाठीही श्री. अण्णासाहेब हे नेहमी प्रयत्नशील असतात. डहाणू आणि तलापरी भागांत आदिवासींची वस्ती पुष्कळ आहे. या सर्वांना शेतीची गोडी लागावी व त्यांची आर्थिक दुरवस्था संपावी म्हणून त्यांनी वेगवेगळया योजना त्यांचेकडून कौशल्याने राबवून घेतल्या आहेत.

ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेच्या स्थापनेपासून ते संचालक मंडळावर आहेत. बँकेच्या कामकाजात ते अतिशय आस्थापूर्वक लक्ष घालीत असतात. चालू वर्षी त्यांची चेअरमनपदी निवड करण्यात आली आहे. शेतीतज्ज्ञ असल्याने श्री. अण्णासाहेब पाटील यांना सभासंमेलने, परिसंवाद वगैरेंसाठी देशात अनेक ठिकाणी जावे लागते, त्या सर्व ठिकाणी आपल्या मार्गदर्शनाने व सौजन्यपूर्ण वागणुकीने त्यांनीं स्वतःची खास छाप पाडली आहे.

श्री. हरिश्चंद्र पाटील हे हाडाचे शेतकरी आहेत. शेतीची सुधारणा आणि आदिवासी जनतेची उन्नती ही दोन प्रमुख कामे त्यांनी स्वीकारलेली आहेत. बोर्डी येथील शाळेचे प्रमुख आणि कोसबाड शेती शिक्षणकेंद्रांचे संचालक म्हणून त्यांनी अनेकांना शेतीविषयक प्रयोगासंबंधी आवड उत्पन्न करून दिली आहे आणि त्यामुळे त्यांचे मार्गदर्शन लाभल्याबद्दल धन्यता व्यक्त करणारे त्यांचे असंख्य विद्यार्थी आहेत.

जिल्हा सहकारी बँकेच्या सुरुवातीपासून ते संचालक मंडळावर आहेत. जिल्ह्यात आणि विशेषतः डहाणू व तलासरी भागांत कोणत्याही सहकारी संस्थेला चालना देण्याचे प्रमुख काम श्री. अण्णासाहेब यांनी स्वीकारलेले आहे. सरकारी नव्या योजना राबवून त्यांचा लाभ त्या त्या भागांतील लोकांना घेता यावा म्हणून ते सतत प्रयत्नशील असतात. अनेक विश्वव्याप सांभाळून जिल्हा बँकेच्या सर्वांगीण प्रगतीसाठीही ते मुद्दाम सवड काढतात आणि अगदी लहानशा सोसायटीच्या पुनरुज्जीवनासाठी बोलविलेल्या सभेपासून सबंध राज्यासाठी आखल्या जाणाऱ्या एखाद्या मोठ्या योजनेच्या विचारविनिमयाच्या बैठकीपर्यंत सर्वत्र सारखाच रस घेऊन समोर आलेल्या कामाबद्दल योग्य प्रकारे मार्गदर्शन करण्याचे काम ते मोठ्या आस्थेने करतात.

श्री. अण्णासाहेब यांनी तरुणपणी शिकारही केलेली आहे आणि त्यामुळे शिकाऱ्याचा दिलदारपणा, धाडस आणि निरलसपणे काम करण्याची प्रवृत्ती त्यांचेमध्ये प्रकर्षाने आढळते. सर्व देशभर शेतीतज्ज्ञ म्हणून त्यांची प्रसिद्धी असतानासुद्धा अगदी लहानशा कार्यकर्त्यालासुद्धा त्यांची भेट घेणे सहज शक्य होते आणि तेही अशा कार्यकर्त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी करतात आणि त्यांच्या अडचणींबाबत मार्गदर्शन करतात.

बँकेचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाल्यापासून निदान आठवड्यातून दोन वेळा तरी बँकेत मुद्दाम येतात, त्याचप्रमाणे सर्व शाखांना भेटी देणे व महत्त्वाच्या संस्थांचे कामकाजात स्वतः लक्ष घालून काम सुधारणे याकडेही ते विशेष लक्ष देतात.

---

### पृथ्वीशी ग्रहखंडाची टक्कर होण्याचा संभव

निसर्गाच्या शक्तीवर मात करण्याचे माणसाचे प्रयत्न प्राचीन काळापासून चालत आलेले आहेत. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धात तर माणूस अंतरिक्षातील साहसेही करू लागला आहे. तरीसुद्धा निसर्गाच्या प्रचंड सामर्थ्यापुढे हतप्रभ होण्याचे प्रसंग अजूनही येतात. ऑस्ट्रेलियांतील एका प्राध्यापकाने असा इषारा दिला आहे की, १९६८ च्या जूनमध्ये पृथ्वीची एका ग्रहखंडाची टक्कर होण्याचा संभव आहे. हा ग्रहखंड १ मैल रुंदीचा असून त्याची स्फोटक शक्ती १,००० हैड्रोजन बॉम्ब इतकी मोठी आहे. पृथ्वीच्या रोखाने येणारा हा पाहुणा बहुधा पृथ्वीपासून ४० लाख मैलांवरूनच दुसरीकडे वळेल. परंतु त्याच्या भ्रमणकक्षेत थोडा जरी बदल झाला तरी तो पृथ्वीवर आदळण्याची शक्यता आहे. पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या कक्षेत जर तो सापडला तर अत्यंत वेगाने वातावरणाचा भेद करून खाली आदळेल. हा तडाखा इतका जबर असेल की त्यामुळे सुमारे २॥ लाख लोकवस्ती असलेले सिडनेसारखे शहर उध्वस्त होऊन जाईल. अशा प्रकारची टक्कर होऊ नये म्हणून शास्त्रज्ञ चर्चा करीत आहेत. काहींच्या मताने हा ग्रहखंड पृथ्वीवर आदळण्यापूर्वीच त्याच्यावर एखाद्या अणुचलित उपग्रहाचा आघात करावा आणि तो नष्ट करून टाकावा. दुसरे काही शास्त्रज्ञ असे सुचवितात की ग्रहखंडावर एक शक्तिशाली अग्निबाण आरूढ करण्यात यावा आणि पृथ्वीकडे असणाऱ्या त्याच्या गतीची दिशा बदलावी. तथापि इतकी तयारी करण्याचे कारणच पडणार नाही, असे मत ब्रिटनमधील एका प्रख्यात शास्त्रज्ञाने व्यक्त केले आहे. त्याच्या मताने हा ग्रहखंड पृथ्वीभोवतालच्या वातावरणातून जोराने खाली येताना उष्णता उत्पन्न होऊन त्यात तो जळून जाईल. पृथ्वीच्या इतिहासात असे प्रसंग आलेले आहेत. १९०८ साली सायबेरियात असाच एक मोठा ग्रहखंड कोसळला. त्यावेळी त्याच्या आघाताने १०० चौरस मैल अरण्य जळाले.

## कपास कापडाच्या धंद्याची परदेशी हुंडणावळीची मिळकत व खर्च

(कोटी रु.)

| | १९६० | १९६१ | १९६२ | १९६३ | १९६४ | पाच वर्षांची बेरीज |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. निर्गतीपासून मिळकत | | | | | | |
| कापड | ६०·३ | ५१·९ | ४६·३ | ४९·५ | ५७·८ | २६५·८ |
| सूत | ३·७ | ३·७ | ५·३ | ६·२ | ५·८ | २४·७ |
| होजिअरी | ०·२ | ०·१ | ०·१ | ०·१ | ०·१ | ०·६ |
| वेस्ट कॉटन | २·४ | ५·३ | ५·० | ४·९ | ३·६ | २१·२ |
| इतर | ६·१ | ४·६ | ४·७ | ८·२ | ८·१ | ३१·७ |
| एकूण मिळकत | ७२·७ | ६५·६ | ६१·४ | ६८·९ | ७५·४ | ३४४·० |
| ब. आयातीमुळे खर्च | | | | | | |
| कपास | ७३·० | ६९·३ | ५८·० | ४२·९ | ५६·१ | २९९·३ |
| सूत | ०·५ | ०·३ | ०·२ | ०·२ | ०·१ | १·३ |
| यंत्रसामग्री | २१·१ | २६·८ | २९·० | २६·९ | २९·९ | १३३·७ |
| रंग | १२·४ | १२·३ | १०·३ | ९·७ | १०·४ | ५५·१ |
| रसायने | ५·५ | ४·६ | ५·५ | ५·१ | ४·७ | २५·४ |
| तेल व वंगण | ४·९ | २·८ | ३·६ | ४·९ | ६·० | २२·२ |
| इतर (रॉयल्टी, इ.) | ०·२ | ०·२ | ०·२ | ०·२ | ०·२ | १·० |
| एकूण खर्च | ११७·६ | ११६·३ | १०६·८ | ८९·९ | १०७·४ | ५३८·० |
| क. निवळ परिस्थिति (अ–ब) | -४४·९ | -५०·७ | -४५·४ | -२१·० | -३२·० | -१९४·० |

## हिंदी कपास कापडाच्या परदेशी बाजारपेठा

| अनुक्रम | बाजारपेठ | लक्ष मीटर्स |
|---|---|---|
| १ | ग्रेट ब्रिटन | १६६३ |
| २ | नेपाळ | ३५७ |
| ३ | पूर्व आफ्रिका | ३२० |
| ४ | सीलोन | २५२ |
| ५ | ऑस्ट्रेलिया | २३१ |
| ६ | अफगाणिस्तान | २३० |
| ७ | सुदान | २२३ |
| ८ | इराणचे आखात | २०५ |
| ९ | अमेरिका | १७२ |
| १० | मलेशिया | १४८ |
| ११ | कॅनडा | १४४ |
| १२ | एडन | १२१ |
| १३ | फ्रान्स | ११३ |
| १४ | न्यूझीलंड | ९५ |
| १५ | सौदी अरेबिया | ७९ |

**चंद्रावरील उपकरण परत आणण्याचा यत्न**—रशियाने चंद्रावर संशोधन करण्यासाठी पाठविलेले उपकरण तेथून परत पृथ्वीवर आणण्याचा प्रयत्न करण्याचे ठरविले आहे. जपानी विद्यार्थ्यांशी बोलताना एका रशियन अंतराळवीराने ही माहिती सांगितली. ह्या प्रयत्नात यश आल्यावर एक कुत्रा चंद्रावर पाठवून तेथून तो परत आणण्याचा कार्यक्रम रशियाने आखला आहे.

## हिंदी कापडाचा धंदा

१९६०–६४ ह्या पाच वर्षांत, हिंदी कपास कापडाच्या धंद्याने परदेशी हुंडणावळीच्या बाबतीत १९४ कोटी रुपयांची तूट दाखविली. म्हणजे, दरसाल सरासरीने ३९ कोटींची तूट पडली. ह्या तुटीचे मुख्य कारण कपाशीची मोठ्या प्रमाणावर आयात, हे होय. ह्या धंद्याने परराष्ट्रीय हुंडणावळ खालील प्रमाणात खर्च केली:—कपास ५६%, यंत्रसामग्री, सुटे भाग २५%, रंग व रसायने १५%, तेले व वंगणे ४%. कपास कापडाचा धंदा परदेशी हुंडणावळीच्या बाबतीत स्वावलंबी व्हावयाचा असेल, तर कच्च्या कपाशीची आयात खूपच कमी करायला हवी. आयात केलेल्या कपाशीच्या सुताचे कापड मुख्यत: भारतातीलच बाजारपेठेत खपते, तेव्हा ह्या बाबतीत काटकसर करायलाच हवी. निर्गत झालेल्या कापडात आयात केलेल्या कपाशीचा अंश १९६४ साली फक्त ४% होता.

## बंगलोर येथे नवीन फिल्म स्टुडिओ

म्हैसूरचे सरकार फिल्म घेण्याचा एक अद्यावत स्टुडिओ बांधण्याचा विचार करीत आहे. त्याची उभारणी सार्वजनिक मालकीच्या विभागात होण्याची शक्यता आहे. बंगलोर येथे अलीकडे खाजगी मालकीचा एक स्टुडिओ स्थापन करण्यात आला आहे. पण, आणखी एका स्टुडिओची आवश्यकता आहे, असे राज्यसरकारला वाटत आहे. म्हैसूर राज्यात चित्रपटाच्या धंद्यांची उभारणी करण्यासाठी होणाऱ्या प्रयत्नांतील हे पहिले पाऊल आहे. ह्याशिवाय धंद्याच्या विकासासाठी आणखीही उपाय योजण्यात येत आहेत. म्हैसूर राज्यात तयार झालेल्या प्रत्येक चित्रपटाला ३० हजार रुपये मदतही देण्यात येणार आहे. मात्र चित्रपटाचे संस्करणसुद्धा म्हैसूर राज्यातच झालेले असले पाहिजे. सर्वांत उत्तम कानडी चित्रपटासाठी ३ बक्षिसे ठेवण्यात येणार आहेत. पहिले बक्षिस ५० हजार रुपयांचे असून, दुसरे २५ हजारांचे आणि तिसरे १० हजार रुपयांचे आहे.

## ब्रह्मदेश सरकारची दक्षता

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात बांधण्यात आलेला ब्रह्मदेश रस्ता ह्या पावसाळ्याच्या दिवसात चालू नसतोच; कारण अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडा पावसाने ढासळलेल्या असतात; काही ठिकाणी तर रस्ताच वाहून गेलेला असतो. युद्धकाळात हा रस्ता म्हणजे ब्रह्मदेशातील दोस्तांच्या सेनेला पुरवठा करण्याचा एक राजमार्ग होता. परंतु आता त्याची दुरुस्ती करून तो वाहतुकीस योग्य अशा परिस्थितीत ठेवण्यात येत नाही. ब्रह्मदेश व चीन ह्यांच्या दरम्यान १,३०० मैलांची सरहद्द आहे. ह्या सरहद्दीवर वाहतुकीची व्यवस्था नीट न ठेवणेच ब्रह्मदेशाच्या सरकारला इष्ट वाटते. वास्तविक ब्रह्मदेश व चीन ह्यांनी कागदावर तरी आपल्यांतील सरहद्दीचा तंटा मिटविलेला आहे. प्रत्यक्ष परिस्थिती मात्र वेगळी आहे. रंगून—इरावती—ब्रह्मदेश हा रस्ता चीनच्या युनान प्रांताला जोडलेला आहे. ह्या मार्गावर चीनचे चांगले लक्ष असून ब्रह्मदेशाला चीनच्या धोरणाबद्दल जागरूकता दाखविणे भाग पडत आहे.

**१०० मैल वेगाने धावणारी आगगाडी**—दिल्ली व आग्रा ह्या शहरांच्या दरम्यान दर तासाला १०० मैल वेगाने पळणारी एक आगगाडी प्रयोग म्हणून चालू करण्याचे घाटत आहे. फ्रान्स, पश्चिम जर्मनी आणि जपान ह्या देशांतून दर तासाला २०० किलोमीटर धावणाऱ्या आगगाड्यांचे प्रयोग करण्यात आले आहेत.

### तांदुळाच्या जागतिक उत्पादनात घट

गेली दोन वर्षे जगातील अनेक देशांत तांदुळाचे भरघोस उत्पादन झाले. परंतु चालू वर्षी मात्र जागतिक उत्पादनात निराशजनक घट होण्याची लक्षणे दिसत आहेत. ह्या बाबतीत तज्ज्ञांनी केलेले अंदाज लक्षात घेता केवळ आशियातील देशांतच नव्हे, तर युरोप आणि आफ्रिका खंडांतील तांदूळ पिकविणाऱ्या देशांचे उत्पादनही घसरणार आहे. जागतिक उत्पादनात आशिया खंडाचा हिस्सा ९० टक्के आहे. बिगर-कम्युनिस्ट देशांतील तांदुळाचे गेल्या वर्षाचे उत्पादन १६·९ कोटी टन होते. १९६५–६६ साली मात्र ते १५·६ कोटी टनांपर्यंत खाली आले. उत्पादनात घट होण्याच्या कारणांत भारतामधील आणि कोरियामधील प्रतिकूल हवामान हे प्रमुख कारण आहे. असेच प्रतिकूल हवामान इतर काही देशांतून अनुभवाला आले. प्रतिकूल हवामानामुळे काही देशांतील तांदूळ-उत्पादन घटले असले तरी व्हिएटनामसारख्या देशात चालू असलेल्या लढाईचाही परिणाम झालेला आहे. पाकिस्तानात मात्र गेल्या वर्षाप्रमाणेच ह्या वर्षीही तांदुळाचे भरपूर उत्पादन होण्याची शक्यता आहे. संयुक्त अरब प्रजासत्ताकातील तांदुळाचे उत्पादनही नैसर्गिक आपत्तीमुळे कमी होणार आहे. अमेरिकेने भारताला तांदूळ पुरविता येणार नसल्याचे कळविले असल्याने पाकिस्तानकडून काय तो भारताला तांदूळ मिळण्यासारखा आहे. आशियातील बहुसंख्य लोकांच्या अन्नात तांदुळावर भर असल्याने तांदुळाची टंचाई त्यांनाच विशेष जाणवणार आहे. भारतालाही टंचाईला तोंड द्यावे लागणार आहेच. संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या तज्ज्ञांनी केलेल्या अंदाजाप्रमाणे ऑस्ट्रेलियातील आणि उत्तर अमेरिकेतील तांदुळाच्या उत्पादनात मात्र गेल्या वर्षाच्या मानाने ह्या वर्षी वाढ होणार आहे. आशियातील उत्पादन वाढविण्यावरच टंचाई कमी होणे अवलंबून आहे.

### सहकारी स्टोअर्समधून पुस्तकांची विक्री

विद्यापीठांतून व कॉलेजांतून लागणारी पाठ्य पुस्तके व तांत्रिक विषयांवरील ग्रंथ, ग्राहक सहकारी संघामार्फत व डिपार्टमेंटल स्टोअर्समार्फत विकण्याची योजना आखण्यात आली आहे. ही पुस्तके गरजूंना वाजवी किमतींत देण्याचा हेतू योजनेमागे आहे. घाऊक सहकारी दुकानांना व डिपार्टमेंटल स्टोअर्सना ५ लाख रुपये किमतीची पुस्तके आयात करण्याचा परवाना भारत सरकारने दिला आहे. दिल्ली येथील सुपर बाजारांमार्फत ह्यापैकी बहुतेक पुस्तकांची विक्री करण्यात येईल. विद्यापीठे व कॉलेजमधील सहकारी स्टोअर्समार्फतही काही पुस्तकांची विक्री करण्यात येईल. पाठ्य पुस्तके मिळण्याबाबतच्या अडचणी ह्या योजनेमुळे कमी होतील.

**१० कोटी रुपयांच्या मालाची मागणी**—गेल्या वर्षी सोव्हिएट रशियाने भारताकडून १० कोटी रुपये किमतीच्या नित्योपयोगी वस्तू विकत घेण्याचा करार केला होता. रशियात हिंदी माल लोकप्रिय करण्यासाठी १९६५ च्या जूनमध्ये मॉस्को येथे एक जाहिरात केंद्र भारत सरकारने उघडले होते. त्याचा परिणाम होऊन रशियाकडून येणारी हिंदी मालाची मागणी बरीच वाढली.

**वैद्यकीय सोयींत वाढ**—गुजरात राज्य सरकारने चालू वर्षात लोकांसाठी करण्यात येणाऱ्या वैद्यकीय सवलतींत वाढ करण्याचे ठरविले आहे. ह्या बाबीवर ६१·८८ लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत. त्यांपैकी ८·७३ लाख रुपये इस्पितळांवर व दवाखान्यांवर आणि ४२·५५ लाख रुपये वैद्यकीय शिक्षणावर खर्च करण्यात येतील.

### रासायनिक खताचा सहकारी कारखाना

भारतामधील अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी रासायनिक खताची मोठ्या प्रमाणावर गरज लागणार आहे. खताचे उत्पादन वाढविण्याच्या कार्यक्रमात अमेरिका व कॅनडा ह्या देशांचे सहकार्य मिळविणे कितपत शक्य आहे ते पाहण्यासाठी भारताचे एक प्रतिनिधिमंडळ त्या देशांच्या दौऱ्यावर गेले होते. ते आता परत आले असून येताना त्याने एक योजना बरोबर आणली आहे. ही योजना अमलात आणण्यासारखी ठरली तर सहकारी क्षेत्रात पहिला खताचा कारखाना निघण्याची शक्यता आहे. ही योजना अमेरिकेमधील को-ऑपरेटिव्ह कॉर्पोरेशनने मांडलेली आहे. अमेरिकेच्या खताच्या उत्पादनापैकी व त्याच्या वितरणापैकी एक चतुर्थांश खताची विल्हेवाट ह्या संघटनेतर्फे लावण्यात येते. ह्यावरून ह्या संघटनेच्या विशालतेची कल्पना येण्यासारखी आहे. खुद्द अमेरिकेच्या व्यापार खात्यालाही संघटनेच्या कार्यक्षेत्राची कल्पना नव्हती. कॉर्पोरेशनने महाराष्ट्र अगर गुजरात राज्यात खताचा कारखाना काढण्याची सूचना केली आहे. कारखान्यासाठी ३०५ कोटी डॉलर्सचा खर्च येणार आहे. त्यांपैकी १·४ कोटी डॉलर्सची रक्कम परदेशीय चलनातच उभारावी लागणार आहे. ही रक्कम भांडवल म्हणून अगर कर्ज म्हणून देण्याची तयारी कॉर्पोरेशनने दाखविली आहे. कारखान्याचे एकूण भांडवल १ कोटी डॉलर्सचे असेल व त्यापैकी ४० लाख डॉलर्सचे भांडवल कॉर्पोरेशन आपल्या नावाने घेईल. बाकीचे भांडवल हिंदमधील सहकारी संघटनांनी आपल्या बळावर उभे करावयाचे आहे. भारताच्या मिश्र अर्थव्यवस्थेत सहकारी संघटनांना ह्यापुढे अधिकाधिक वाव मिळत जाणार आहे. खताच्या धंद्यात सहकारी तत्त्वाचा प्रवेश झाला, तर तो इष्ट ठरण्यासारखा आहे.

### किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि.

किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि. ने ३१ मार्च, १९६६ अखेर संपलेल्या वर्षी १०·७४ कोटी रु. ची विक्री करून १२५·३३ लक्ष रु. ठोक नफा मिळविला. घसारा, मॅनेजिंग एजंटांचा मुशाहिरा, डेव्हलपमेंट रिबेट रिझर्व्ह, कर, ह्यांची तरतूद करून निव्वळ नफा ३५·०६ लक्ष रु. उरला. १६% डिव्हिडंड कायम ठेवले जाईल. मागील वर्षी ८·१७ कोटी रु. ची विक्री झाली होती.

### " मुरारजी हाच आमचा देव "

एक सामाजिक कार्यकर्ता एका कोळ्याच्या झोपडीत गेला असताना, त्याला तेथे देवाच्या तसबिरीच्या जागी श्री. मुरारजी देसाई ह्यांचा फोटो लावलेला आढळला. ह्या बदलाचे कारण विचारता, तो कोळी म्हणाला, " मी देवाची पूजा करीत होतो, तेव्हा मला दरमहा फक्त ३० रु. ची प्राप्ती होत असे. श्री. मुरारजींनी दारूबंदी केल्यापासून मला हातभट्टीची दारू करून ३०० रु. मिळू लागले आहेत. मग मी त्यांची पूजा का करू नये? ते आणि दारूबंदी चिरायू होवो ! " रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर, श्री. एच. व्ही. आर. अय्यंगार, ह्यांनी ही ऐकलेली गोष्ट एका भाषणात सांगितली.

### " चुप बैस "

ग्रेट ब्रिटनच्या राज्यकर्त्या राणीची आई, एलिझाबेथ ही लंडन येथील एक प्रदर्शन पाहावयास गेली होती. तेथील हिंदी मीना पक्षी कसे बोलतो, ते ऐकण्याची तिने त्याच्यासमोर इच्छा व्यक्त केली, तशी तो पक्षी चटकन 'चुप बैस" असे उद्गारला!

### सिमेंटच्या कारखान्यांवर अवमूल्यनाचा परिणाम

सिमेंटच्या धंद्याच्या संघटनेचे अध्यक्ष श्री. जी डी. सोमाणी ह्यांनी असे मत व्यक्त केले आहे की ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमात सिमेंटच्या कारखान्याच्या विस्ताराच्या ज्या योजना आखण्यात आल्या आहेत त्या अमलात आणण्याच्या कामी रुपयाच्या अवमूल्यनामुळे अडचणी उत्पन्न होणार आहेत. अवमूल्यनामुळे भांडवली खर्चात १५ ते २० टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विस्ताराच्या योजनांसाठी सुमारे ३० कोटी रुपये अधिक लागणार आहेत. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस १ कोटी टन अधिक सिमेंट उत्पादन करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. परंतु, आता हे उद्दिष्ट गाठण्यास १ वर्षाचा अधिक काळ लागणार आहे. चालू वर्षी आणखी दोन अगर तीन नवे कारखाने उत्पादन करू लागतील. मग सिमेंट अधिक सुलभतेने मिळू शकेल.

### कांद्यांच्या बाजारपेठेला धोका

सीलोन हा देश हिंदमधील कांद्यांची एक महत्त्वाची बाजारपेठ आहे. त्या देशाला लागणारा जवळजवळ सर्व कांदा भारतामधून निर्यात करण्यात येतो. ही निर्यात दरसाल जवळजवळ ६० ते ७० हजार टनांची आहे. परंतु आता ह्या बाजारपेठेला धोका उत्पन्न झाला आहे. त्याचे कारण अवमूल्यनानंतर हिंदी कांद्यांची वाढलेली किंमत हे आहे. रुपयाच्या अवमूल्यनानंतर भारतामधील कांद्यांची किंमत टनामागे २७ पौंड झाली आहे. लेबॅनॉनमधील कांद्यांची किंमत टनामागे २४ पौंड असल्याने सीलोनमधील व्यापारी त्या देशाकडून कांद्यांची आयात करण्याच्या विचारात आहेत. लेबॅनॉनकडून सीलोनला कांद्यांचा पुरवठा अद्याप मोठ्या प्रमाणावर होत नाही. परंतु किंमतीमधील फरक असाच राहिला तर हिंदी कांद्यांची निर्यात घटेल.

### राजस्थानात लोकरीच्या सुताची गिरणी

राजस्थानात बिकानेर ह्या ठिकाणी जपानच्या सहकार्याने लोकरीच्या सुताची एक गिरणी स्थापन करण्यात येणार आहे. गिरणी सार्वजनिक मालकीच्या विभागात असेल. गिरणीची जागा निवडण्यासाठी व इतर प्राथमिक तयारी करण्यासाठी काही जपानी एंजिनिअर्स लवकरच भारतात येणार आहेत. गिरणी उभारण्याठी ३२० लाख रुपयांचा खर्च येईल, असा अंदाज करण्यात आला आहे. त्यापैकी १० टक्के रक्कम जपानमधील एका कारखान्याला पाठविण्यात आली आहे. हा कारखाना लोकरीच्या गिरणीची यंत्रसामग्री बनविण्यात अग्रेसर समजण्यात येतो. कारखान्यात लोकर साफ करण्याची, लोकरीचे सूत काढण्याची आणि सुतावर अखेरचा हात फिरविणारी यंत्रसामग्री बसविण्यात येणार आहे. प्रारंभी १०,२०० चात्या बसविण्यात येतील. त्यांच्या साह्याने दरसाल ३६ लाख किलोग्रॅम लोकर तयार होऊ शकेल.

### गुजरात राज्यातील खताचा कारखाना

गुजरात राज्यातील खताच्या कारखान्याचा विस्तार करण्यास मध्यवर्ती सरकारने मान्यता दिली आहे. कारखान्याची उत्पादनक्षमता वाढवून ती आता दुप्पट करण्यात येणार आहे. ह्या कामासाठी सुमारे १५·५ कोटी रुपये खर्च येईल व त्यापैकी ७·२९ कोटी रुपयांचा खर्च परदेशी चलनात करावा लागेल. जपानकडून मिळणाऱ्या पाचव्या कर्जाचा उपयोग ह्या कामासाठी करण्यात येण्याची शक्यता आहे. कारखान्याची उभारणी होण्यास २७ महिने लागतील. कारखान्यात ४ प्रकारची रासायनिक खते तयार करण्यात येतील.


## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

| : मुख्य कचेरी : | : विभागीय कचेरी : |
|---|---|
| ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई. | महाल : नागपूर. |
| टेलिफोन नं. २५५४७४–७५, | तारेचा पत्ता : |
| २५६२१४, २५४७८१ | फार्मर बँक |

| | | | |
|---|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... | रु. | ५,६५,६६,००० |
| गंगाजळी व फंड | ... | रु. | १,७५,५५,००० |
| ठेवी | ... | रु. | ४३,८६,६३,००० |
| खेळते भांडवल | ... | रु. | १,००,८६,८१ ००० |


: शाखा :

( १ ) भायखळा ( २ ) गोरेगाव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले ( पूर्व ) ( ७ ) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम) (१५) सिताबर्डी (१६) धरमपेठ (१७) धन्तोली (१८) सदर बझार.


ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

श्री. वा. काळे ह्यांची

कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके

१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल, ३ तुमचे स्थान कोणते ?

### सावंतवाडी अर्बन को. बँकेचा लवाद दावा रद्द

बेळगावची सुप्रीम बँक लिक्विडेशनमध्ये गेली त्या वेळी सावंतवाडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे नऊ हजार रुपये तिच्याकडे येणे होते. व्याजासह ही रक्कम १५,००० रुपये होते, ही रक्कम अखेरपर्यंत वसूल होऊ शकली नव्हती. सावंतवाडी अर्बन बँकेच्या त्या वेळच्या संचालकांनी सुप्रीम बँकेत पैसा नियमबाह्य रीतीने ठेवून को-ऑपरेटिव्ह ॲक्ट १९२५ च्या २७ व्या कलमाचा भंग केला म्हणून ही रक्कम त्या संचालकांकडून सव्याज वसूल करावी असा सहकारी खात्याने आदेश दिल्यामुळे सावंतवाडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेने आपल्या सात माजी संचालकांवर पंधरा हजार रुपयांचा दावा श्री. दा. कृ. जडये यांच्या सहकारी लवाद कोर्टात दाखल केला होता. श्री. जडये यांनी या प्रकरणी चाळीस पानी निकालपत्र दिले असून त्यात याबाबतच्या कायद्याची व पुढे आलेल्या पुराव्याची कसोशीने छाननी करून त्या वेळच्या संचालकांनी सुप्रीम बँकेमध्ये ठेवलेली रक्कम ही वरील कलमाच्या विरुद्ध आहे असे मानले; पण बँकेने दावा दाखल केल्या वेळी १९६१ चा नवीन को. ॲक्ट लागू झाला होता त्यामुळे मुदतीच्या कायद्याची हरकत या दाव्याला येते असे मानून दावा रद्द केला.

### ५ लक्ष पौंडांच्या बनावट नोटा

अनेक देशांत जाळे पसरविलेल्या एका टोळीने रॉयल बँक ऑफ स्कॉटलंडच्या सुमारे ५ लक्ष पौंड किमतीच्या बनावट नोटा प्रसृत केल्या असल्याचे उघडकीस आले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर बनावट नोटा केल्याचे युरोपातील हे पहिलेच उदाहरण आहे. झुरिच येथील एका बँकेत अशा ३०,००० पौंडांच्या नोटा मोडून घेण्यासाठी एक मनुष्य गेला, तेव्हा काही नोटांवर वॉटर मार्क नसल्याचे आढळून आले. इटली, कोर्सिका, फ्रान्स आणि अल्जिअर्स येथे चोरटी वाहतूक करण्यासाठी कुप्रसिद्ध असलेल्या असामीचा पोलीस युरोपभर तपास करीत आहेत. नोटांचे कोरे कागद चोरून त्यांवर बनावट छपाई करण्यात आली. ४० हजार पौंडांच्या नोटा पोलिसांच्या ताब्यात असून गुन्हेगारांना पकडण्यास उपयोगी ठरणारी बातमी देणारास बँकेने ५,००० पौंडांचे बक्षीस जाहीर केले आहे.

### पंजाबमध्ये साठेबाजांविरुद्ध मोहीम

पंजाबच्या गव्हर्नरांनी राज्यातील साठेबाज, नफेबाज आणि भेसळ करणारे व्यापारी ह्यांच्याविरुद्ध जोराची मोहीम हाती घेतली आहे. पोलिसांनी सुमारे १,००० छापे घालून सिमेंट, रॉकेल, डिझेल, खाद्यतेले आणि दैनंदिन जीवनासाठी लागणाऱ्या इतर अनेक वस्तू ह्यांचे मोठे साठे उजेडात आणले आहेत. ह्या प्रकरणात ६०० व्यापाऱ्यांना अटक करण्यात आली. त्यांपैकी काहीजण राजकीय दबाव आणण्यास समर्थ असे होते. ह्या छाप्या-झडत्यांच्या सत्रामुळे व्यापारी वर्ग चांगलाच हादरला आहे. अनेक व्यापाऱ्यांनी आपल्याजवळील वस्तूंचा साठा जाहीर करून त्या मालाची खुल्या बाजारात विक्री करण्याची तयारी दाखविली. काही व्यापाऱ्यांनी गिऱ्हाइकांकडून घेतलेल्या जादा नफ्याची रक्कम परत करण्याचीही तयारी दाखविली. झडत्या व छापे घालण्याच्या कामी अत्यंत गुप्तता राखण्यात आली होती, व ते कार्यक्षमतेने घालण्यात आले.


पुष्पाचे बालिश हट्ट
मी कमीच पुरवले.
म्हणून ती माझेवर
नाखूष असे.
लग्न सोहळ्यातील
थाट तिचे ---
लाजरेहास्य तिला
खुलवीत आहे.
आळस न करता
मी बँकेत पैसे का
ठेवत असे ते ती
आज उमजली.
- बाबा



दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
'सविनय' सेवा
सातारा.

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | ११·९९ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १६·०८ ,, |
| ठेवी | ... | रु. | ४३८·०२ ,, |
| खेळते भांडवल | ... | रु. | ४९०·७३ ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणे व बेळगाव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.



स्थापना १९१८


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.